प्रेस नोट

दिनांक :- २८/०७/२०२५

आलोसे क्र.१) श्री. जितेंद्र पांडुरंग ठाकरे, वय ५७ वर्ष, पद मंडळ अधिकारी, महागाव कसबा, ता.दारव्हा जि.यवतमाळ रा. नातुवाडी दारव्हा, ता. दारव्हा, जि.यवतमाळ अधिक ३ तलाठी व एक खाजगी ईसम यांना लाच स्विकारतांना लाचलुचपत प्रतिबंधक विभाग यवतमाळ, यांनी रंगेहाथ पकडलेबाबत...

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | यवतमाळ युनिट |
| पो.स्टे व गुन्हा नोंद कमांक व कलम | पो.स्टे. दारव्हा जिल्हा-यवतमाळ, अप.क्र. ५१५/२०२५<br>कलम ७,७ A ,१२ भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ |
| लोकसेवकाचे नांव व कार्यालय | १) आलोसे क्र. श्री. जितेंद्र पांडुरंग ठाकरे, वय ५७ वर्ष, पद मंडळ अधिकारी, महागाव कसबा, ता.दारव्हा जि.यवतमाळ रा. नातुवाडी दारव्हा, ता. दारव्हा, जि.यवतमाळ<br>२) आलोसे क्र. श्री. जय गणेश सोनोने, वय २६ वर्ष, पद ग्राम महसुल अधिकारी, साजा हरु क्र.३०, ता.दारव्हा, जि.यवतमाळ, रा.राणीलक्ष्मीबाई वार्ड, आखाडा रोड, पांढरकवडा जि.यवतमाळ, ह.मु.शिवानंद थोरवे यांचे घरी बापुजी नगर दारव्हा जि.यवतमाळ<br>३) आलोसे क्र. श्री. पवन तानसेन भितकर, वय ३० वर्ष, पद ग्राम महसुल अधिकारी, साजा पाळोदी क्र.११, ता. दारव्हा जि.यवतमाळ, रा.अंबिकानगर दारव्हा जि.यवतमाळ<br>४) आलोसे क्र.श्री. निलेश भास्कर तलवारे, वय ३० वर्ष, पद ग्राम महसुल अधिकारी, साजा हातणी क्र.३७, ता. दारव्हा, जि.यवतमाळ, रा.वार्ड नंबर २, इंदिरा नगर, लाडखेड, ता. दारव्हा, जि.यवतमाळ<br>५) खाजगी ईसम क्र. श्री. अशोक श्रावन रमखाम, वय ५९ वर्ष, खाजगी ईसम धंदा रोज मजुरी, रा. हरु, ता. दारव्हा, जि.यवतमाळ (खाजगी ईसम) |
| मागितलेली लाचेची रक्कम | ४०,०००/- रूपये |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | दि. २१/०७/२०२५ रोजी ऑनलाईन १७००० रु. व दि. २४/०७/२०२५ रोजी ७५००/- रूपये |
| थोडक्यात हकिकत | यातील तक्रारदार यांचा मुरुम व रेती वाहतुकीचा कायदेशीर व्यवसाय आहे. ते दि. २१/०७/२०२५ रोजी दारव्हा येथे मुरुमाची वाहतुक करिता असतांना त्यांचा ट्रॅक्टर पंक्चर झाल्याने उभा होता. त्यावेळी नमुद लोकसेवकांनी त्याचे ट्रॅक्टर जवळ जावुन त्याचे ट्रॅक्टरवर कारवाई करण्याबाबत म्हटले असता, तक्रारदार यांनी त्यांचेकडे रॉयल्टी ची पावती असल्याचे दाखवुन ट्रॅक्टर पंक्चर झाल्यामुळे थांबला असल्याचे सांगुन कारवाई न करण्याची विनंती केली होती परंतु नमुद लोकसेवकांनी त्यांना कारवाईची भिती दाखवुन कारवाई न करण्याकरिता ४०००० रु ची मागणी करुन तक्रारदार यांचेकडुन १७००० रु त्याच दिवशी ऑनलाईन स्विकारले व उर्वरीत २३००० रु देण्याची मागणी केली .तक्रारदार यांना लोकसेवकांना लाच देण्याची ईच्छा नसल्याने त्यांनी दि.२२/०७/२०२५ रोजी लेखी तक्रार दिली होती. दि.२२/०७/२०२५ व २३/०७/२०२५ रोजी तक्रारीची पडताळणी करण्यात आली होती. त्यात आरोपीतांनी लाच मागणी केल्याचे निष्पन्न झाल्याने दि. २४/०७/२०२५ रोजी आरोपीतांनी खाजगी ईसमाचे मार्फतीने वर नमुद ठिकाणी लावलेल्या सापळा कारवाई दरम्यान उर्वरीत लाच रकमेपैकी पहिला हप्ता ७५०० रु. पंचा समक्ष स्विकारले. त्यांना लाचेच्या रकमेसह ताब्यात घेवुन, तक्रारदार यांची तक्रार नोंदवुन गुन्हयाचे तपासकामी अटक करण्यात आली आहे. गुन्हयाची पडताळणी व सापळा यांची माहीती मा.वरिष्ठांना फोनद्वारे कळविलेली असुन त्यांनी केलेल्या मार्गदर्शनाप्रमाणे पुढील तपास करित आहोत.. |

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,यवतमाळ तर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणा-या लोकसेवका बद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, यवतमाळ येथे संपर्क करावा.

---

संपर्क पत्ता :- लाचलुचपत प्रतिबंथक विभाग, यवतमाळ, दगडी इमारत, टांगा चौक यवतमाळ
संकेत स्थळ :- dyspacbyavatmal@mahapolice.gov.in
टोल फ्री कमांक :- १०६४ दुरध्वनी कमांक :- ०७२३२- २४४००२

श्री. अभय आष्टेकर, पोलीस उपअधीक्षक, ला.प्र.वि. यवतमाळ मो.नं. ८२७५०८८७९७
श्री.अर्जुन घनवट,पोलीस निरीक्षक ,ला.प्र.वि.यवतमाळ.मो.नं.९६२३१०१७०६
श्री.मनोज ओरके ,पोलीस निरीक्षक, ला.प्र.वि.यवतमाळ.मो.नं.८८५५०८०००७

28/07/25
(मनोज ओरके)
पोलीस निरीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, यवतमाळ